# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 &
Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Shyam Khandare
Director
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 65 /2021 Dt : 24/02/2022

प्रती,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालय
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषयः— रासेयो सहितेच्या व कोविड—१९ च्या निर्देशाचे पालन करुन विशेष शिबीराचे आयोजन करण्याबाबत.

महोदय,

युवा कल्यान क्रिडा मंत्रालय, भारत सरकार अंर्तगत रासेयो संहिता भाग ३ अंर्तगत प्रकरण १ २ ३ अन्वये निर्देशित माहीतीनुसार राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर आयोजनाबाबत दरवर्षी महाविद्यालयाला सुचित करण्यात येते मा. कुलगुरु तथा अध्यक्ष रासेयो यांच्या मान्यतेनुसार खालील खालील बाबीसंदर्भात आपले लक्ष वेधुन नोंद घेण्यासंदर्भात विनंती करण्यात येते आहे.

**मा. जिल्हाधिकारी, तहसिलदार, ग्रामपंचायत सरपंच, अशा स्थानिक प्रशासनाची मान्यता कोविड – १९ नियमानुसार घेणे आवश्यक आहे.**

१) विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या कालावधीत विशेष शिबीराचे प्रस्ताव कार्यालयाला सादर करणे अनिवार्य आहे. शिबीर प्रस्तावाशिवाय आयोजीत शिबीराला अनुदान मान्य करणे शक्य होणार नाही.

२) महाविद्यालयाने शिबीराचे आयोजन महाविद्यालय परिसरात न करता दत्तक ग्रामातच शिबीर आयोजन करणे अनिवार्य आहे. तसेच महाविद्यालय परिसरात शिबीर आयोजनाबाबतचा प्रस्ताव विद्यापीठाला सादर करण्यात येऊ नये. कृपया गांभिर्याने नोंद घ्यावी.

३) आयोजीत शिबीराचा कालावधी पुर्णतः सात दिवसाचा असने अनिवार्य आहे. शिबीराकरीता मंजुर विद्यार्थी संख्येनुसार महिला व पुरुष कार्यक्रम अधिकारीसह शिबीर कालावधीत उपस्थित असने अनिवार्य आहे. रासेयो स्वंयसेवकांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, या करीता शिबीराचे नियोजन विद्यापीठ परिक्षेचा कालावधी लक्षात घेवुन करण्यात यावे.

४) आयोजित शिबीरात दत्तक ग्रामातील ग्रामस्थाचा सहभाग विविध उपक्रमांतर्गत उदा. श्रमदान, बौध्दिक सत्र, व सांस्कृतीक संदेशपर कार्यक्रम इत्यादीमध्ये असावा.

५) शिबिरामध्ये शासन निर्देशित व तसेच विद्यापीठाने सुचित केलेले अभिनव प्रकल्प, सर्वेक्षण, इत्यादीचा समावेश असावा.

६)दत्तक ग्राम शिबीराचे आयोजनापुर्वी जवळच्या पोलीस स्टेशन तसेच स्थानीक पोलीस पाटिल यांना सुरक्षेच्या दृष्टिकोनातुन पुर्वसुचना देण्यात यावी.

७) शिबीरार्थी शिबीरात सहभागी होण्यापुर्वी त्याचे रासेयो बाबत उदबोधन वर्गाचे आयोजन तसेच शिस्त व नियमाचे पालन करण्यासंदर्भात मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. शक्य तोवर शिबीराच्या कार्यक्रमात आभार प्रदर्शन, प्रार्थना, इत्यादी जबाबदारी शिबिरार्थीना देण्यात यावी.

८) दत्तक ग्राम शिबीर कालावधीत लोक सहभाग मिळण्याकरीता दत्तक ग्रामाच्या मध्यभागी किवा वस्तीमध्ये शिबीराचे आयोजन करणे आवश्यक आहे. जणेकरुन ग्रामस्त लोक सहभाग संपुर्ण पणे मिळेल. लोक सहभाग मिळु शकत नसेल तर त्या ठिकानी शिबीराला मान्यता देता येणार नाही. किवा आयोजीत शिबीर मंजुर करता येणार नाही. कुपया नोंद घ्यावी.

९) शिबिराच्या नियमांचे कटाक्षाणे पालन करण्याबाबत व स्वत:जबाबदारीबाबत पुरुष कार्यक्रम अधिकारी व महीला कार्यक्रम अधिकारी शिबीरात सहभागी असणे व पालकाचे हमीपत्र शिबीरार्थीकडुन घेण्यात यावे.

१०) शिबीर स्थळी रासेयो स्वंयसेवक रासेयो बॅच तसेच बौध्दिक सत्रात रासेयो डायरीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. (डायरी व बॅच विद्यापीठात उपलब्ध आहे आपल्या दुतामार्फत किवा आपन प्रत्यक्ष येवुन घेवुन जावे)

११) शिबीरस्थळी लावण्यात येणाऱ्या बॅनरवर विद्यापीठाचा, महाविद्यालयाचा शिबिर स्थळ व कालावधी आणि आझादी का अमृत महोत्सव लोगो असणे आवश्यक आहे व नामोल्लेख असणे अनिवार्य आहे. तसचे शिबिर स्थळासंदर्भात माहीती व्हावी या करीता मुख्य मार्गावर शिबीर स्थळ निर्देशित फलक लावणे अनिवार्य आहे.

१२) शिबीर आयोजन कार्यक्रम पत्रीका मा. कुलगुरु मा. राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो कक्ष मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांना nssmantralaya@gmail.com या ई मेल आयडिवर व मा. संचालक रासेयो प्रादेशिक केद्र, पुणे यांना nssrcpune@gmail.com या ई मेल आयडिवर तसेच रासेयो कार्यालय गोंडवाना विद्यापीठ nssdsw.gug@gmail.com या ई मेल आयडिवर शिबीर सुरु होण्याच्या दोन दिवस पुर्वी पाठविणे अनिवार्य आहे.

१३) शिबीराच्या आयोजनानंतर १५ दिवसाचे आत शिबीराचे लेखे व उपयोगिता प्रमाणपत्र संपुर्ण माहीतीसह कार्यालयाने दिलेल्या विहीत प्रारुपातच सादर करणे अनिवार्य आहे. निर्धारीत कालावधीनंतर प्राप्त हिशेबाचे समायोजन किवा मान्यता देणे शक्य होणार नाही.

१४) विशेष शिबीरच्या कार्यक्रमाचे छायाचित्र जीपीएस मैप कैमरा ने काढावे. अन्य छायाचित्र ग्राहय धरल्या जाणार नाही.

१५) विशेष शिबीर मध्ये मतदान जनजागृती, कोविड लसीकरण या संदर्भात कार्यक्रमाचे आयोजन करावे.

कृपया उपरोक्त बांबीसंदर्भात संबधीत कार्यक्रम अधिकारीना गांभीर्याने नोंद घेण्याबाबत सुचित करावे, ही विनंती.

टिप:–१) राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे आयोजन स्थानिक प्रशासनाची मान्यता घेऊन प्रशासकिय अधिकारी यांना बोलावणे आवश्यक आहे.

२) दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत सदर विशेष शिबीर आयोजीत करुन संपन्न करावे.

**डॉ. श्याम खंडारे**
**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**प्रतीलीपी,**

**१) मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो मंत्रालय, मुंबई.**

**२) मा. कुलगुरु कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**३) मा. कुलसचिव कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**४) सर्व जिल्हा व क्षेत्रिय समन्वयक रासेयो, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.यांना माहीतीकरीता.**

महाराष्ट्र शासन
महसुल विभाग
## जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@gmail.com
फोन क्रमांक - 07172-250659
क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सां.ले./2022/196
दिनांक :- 21 फेब्रुवारी, 2022

प्रति,

तहसिलदार (सर्व)

**विषय :-** **रासेयो विभागाचे महाविद्यालयीन विशेष शिबीर आयोजनाकरीता मान्यता मिळण्याबाबत.**

**संदर्भ :-** 1. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांचे कार्यालयीन पत्र क्र./जीयु /एनएसएस/38/2022/ दि.04.02.2022
2. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2022/31 दिनांक 14.01.2022

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्र.01 अन्वये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत रासेयो महाविद्यालयाकडून विशेष शिबीराचे आयोजन करण्यास मान्यता प्रदान करण्याबाबत संचालक, राष्ट्रीय सेवा योजना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी या कार्यालयास विनंती केलेली आहे.

संदर्भिय पत्र क्र.02 चे आदेशान्वये लग्नसमारंभ, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकिय व इतर मोठया प्रमाणात गर्दी होणा-या कार्यक्रमांना परवानगी देण्याचे अधिकार संबंधित तहसिलदार तथा तालुका Incident Commander (सर्व) यांना देण्यात आलेले आहे. सबब संदर्भिय क्र. 01 पत्राचीप्रत आपणाकडे या सोबत पाठविण्यात येत आहे. पत्रात नमूद मुदयांचे अनुषंगाने उचित कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधितास परस्पर कळविण्यात यावे.

**सहपत्र:- वरप्रमाणे**

**(विशालकुमार मेश्राम)**
निवासी उपजिल्हाधिकारी तथा सचिव.
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर

**प्रतिलीपी:-** संचालक, राष्ट्रीय सेवा योजना गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांना माहितीस तथा आपले अधिसस्त महाविद्यालयातील प्राचार्य यांना उक्त परवानगी संबंधाने संबंधित तहसिलदार तथा तालुका Incident Commander यांचेशी संपर्क साधण्याबाबत आपल्या स्तरावरून सूचित करावे.

सही/-
निवासी उपजिल्हाधिकारी तथा सचिव.
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर

महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली

तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली-442605
▸ टोल फ्री क्रमांक :1077 ▸ हॉटलाईन क्र.: 2007 ▸ दूरध्वनी क्र.: 07132-222035/31/30
▸ मोबाईल क्र.: 9423911077 ▸ E-mail id :dmcellgadchiroli@gmail.com

जि.का./क्र.कार्या-3/अका.आव्यक/कावि- 106 /2022 दिनांक :10 फरवरी, 2022

प्रति,

संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

**विषय- रासेयो विभागाचे महाविद्यालयीन विशेष शिबीर आयोजनाकरीता मान्यता मिळण्याबाबत.**

संदर्भ- १) या कार्यालयाचे आदेश क्र.अका-आव्यक/कावी/ ७८/२०२२ दिनांक ०१/०२/२०२२
२) संचालक,राष्ट्रीय सेवा योजना, गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली यांचे कार्यालयीन पत्र क्र.GU/NSS/३७/२०२२ दिनांक ०४/०२/२०२२

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, गडचिरोली जिल्हयात कोविड-१९ अंतर्गत संदर्भिय आदेश सद्यास्थितीत लागू असून संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत रासेयो महाविद्यालयाकडून विशेष शिबीराचे आयोजन करण्यास मान्यता प्रदान करण्यास विनंती केलेली आहे.

उक्त संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये गोंडवाना विद्यापीठा अंतर्गत रासेयो शिबीराचे आयोजन करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी प्रदान करण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

१. कमाल ५० चे मर्यादेत उक्त शिबीरांचे नियोजन करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२. **कोविड-१९ संदर्भाने केंद्र शासन/राज्य शासन यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे/आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.**
३. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी व्यक्तींमध्ये भौतिक दृष्टया कमीत कमी संपर्क येईल याची दक्षता घ्यावी .
४. संबधितांना नेहमी कार्यालयाचे ओळखपत्र बाळगणे अत्यावश्यक आहे.
५. सदर कार्यक्रमस्थळी मास्क,सॅनिटायझर, सामाजिक अंतर राखणे इत्यादी बाबत आवश्यक खबरदारी घ्यावी.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,गडचिरोली

प्रतिलिपी- माहितीस तथा कार्यवाहीस अग्रेषित

१. मा.कुलगुरू, गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली
२. पोलीस अधिक्षक, गडचिरोली
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गडचिरोली
४. उप विभागीय अधिकारी , (सर्व)
५. तहसिलदार , (सर्व)

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,गडचिरोली

# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Shyam Khandare
Director
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 1370/2021 Dt : 29/11/2021

प्रति,

मा. डॉ. प्रभाकर देसाई
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर —३
महापालीका मार्ग, धोबीतलाव मुंबई ४०००0१,

**विषय:— रासेयो विभागाचे महाविद्यालयीन विशेष शिबीर आयोजनाबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय विनंती या प्रमाणे कि, कोविड—१९ च्या प्रादुर्भावामुळे गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत रासेयो महाविद्यालयांकडून रासेयो विभागाला विचारणा केली जात आहे कि, सत्र २०२१—२२ मध्ये महाविद्यालयीन विशेष शिबीर आयोजन करायचे आहे किंवा नाही.

करीता सत्र २०२१—२२ मध्ये महाविद्यालयीन विशेष शिबीर आयोजन करावयाचे किंवा नाही याबाबत मार्गदर्शन करावे, ही विनंती.

धन्यवाद!

डॉ. श्याम खंडारे
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

माहीतीस्तव:—

मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
मा. प्र—कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

परिशिष्ट – ५

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# राष्ट्रीय सेवा योजना

**शिबिर आयोजनासाठी प्रस्ताव**

(अ) राष्ट्रीय सेवा योजना पथकाविषयी मूलभूत माहिती : ..............................

(१) महाविद्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता : ..............................

..............................

..............................

(२) प्राचार्यांचे नाव : ..............................

(३) रा.से.यो. कार्यक्रम अधिकाऱ्यांचे नाव : ..............................

(४) चालू वर्षात महाविद्यालयासाठी विद्यापीठाने मंजूर केलेली नियमित रा.से.यो. अंतर्गत एकूण विद्यार्थी संख्या : ..............................

(५) रा.से.यो. पथकात प्रत्यक्ष नोंदणी केलेली विद्यार्थी संख्या : ..............................

(६) कार्यक्रम अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण झाले आहे काय ? : ..............................

झाले असल्यास कालावधी व तारखा : ..............................

**(ब) शिबिर स्थळाविषयी माहिती :**

(शिबिर स्थळाविषयी संपूर्ण माहिती शिबिरपूर्व सर्वेक्षण ग्रामपंचायत कार्यालयातील माहितीच्या आधारे भरावी)

(१) शिबिर आयोजित करीत असलेल्या गावाचे/वस्तीचे नाव संपूर्ण पत्त्यासहीत : ..............................

(२) शिबिर स्थळापासून जवळचे बसस्थानक/रेल्वे स्थानक : ..............................

(३) महाविद्यालयापासून शिबिर स्थळाचे अंतर : ..............................

(४) शिबिर आयोजित करीत असलेले गाव/वस्ती महाविद्यालयाने रा.से.यो.अंतर्गत दत्तक घेतले आहे काय ? असल्यास किती वर्षापासून : ..............................

(५) शिबिर आयोजित करीत असलेल्या गावी यापूर्वी शिबीर आयोजित केले होते काय? असल्यास त्याचा कालावधी व तारखा : ..............................

(६) शिबिर आयोजित करीत आलेल्या गावातील/वस्तीच्या ग्रामपंचायत सरपंचाचे संपूर्ण नाव : ..............................

नगरपालिका व महानगरपालिका असल्यास वार्ड सदस्याचे नाव ..............................

(७) शिबिर आयोजित करीत असलेले गाव/वस्ती ज्या पंचायत/विकास खंडात समाविष्ठ आहे, त्या पंचायत समितीच्या खंड विकास अधिकारी व सभापतीचे नाव : ..................

(८) गाव/वस्ती ज्या महसूल उपविभागात समाविष्ट आहे, त्या महसूल उपविभागीय अधिकाऱ्याचे नाव : ..................

(९) शिबिर आयोजित करीत असलेल्या गावाची लोकसंख्या : ..................

(१०) गावातील घरांची संख्या : ..................

(११) गावातील साक्षरतेची स्थिती साक्षर : ..................

(१२) गावातील प्रमुख : ..................

(१३) गावातील प्रमुख सार्वजनिक संस्था (स्थानिक स्वराज्य संस्थेसहित) : ..................

(क) गावात उपलब्ध असलेल्या सोयी सवलती
(उपलब्ध सोयी असल्यास ✓ खूण दर्शवावी)

(१) मुख्य रस्त्यापासून गावाला जोडणारा पक्का रस्ता : ( )
(२) वीज गावात/ शेतीला : ( )
(३) पिण्याचे पाणी विहीर, नळयोजना, तलाव : ( )
(४) बाजारपेठ : ( )
(५) दवाखाना खाजगी : ( )
(६) दवाखाना सरकारी : ( )
(७) डाकघर, टेलीफोन, मोबाईल : ( )
(८) ग्रंथालय : ( )
(९) सिनेमागृह : ( )
(१०) संगणक व इंटरनेट सुविधा : ( )
(१०) शैक्षणिक सोयी : ( )
 (अ) पूर्व प्राथमिक शाळा : ( )
 (ब) प्राथमिक शाळा : ( )
 (क) पूर्व माध्यमिक शाळा : ( )
 (ड) माध्यमिक शाळा : ( )
 (इ) कनिष्ठ महाविद्यालय : ( )

(ड) गावात सुरू असलेल्या विकास योजना (उदा. एकात्मिक ग्रामीण विकास योजना, राष्ट्रीय रोजगार योजना, रोजगार हमी योजना, कृषी विकास योजना, इतर आर्थिक व सामाजिक विकासाच्या शासकीय योजना) : ..................

**(इ) वरील गाव / वस्ती शिबिरासाठी निवडण्याची प्रमुख कारणे**

**(अ) शिबिराची पूर्व तयारी :**

(१) निवडलेल्या गावाला किती भेटी दिल्या ? : ..................

(२) गावात शिबिर आयोजनासंबंधी कुणाच्या भेटी घेतल्या ? त्यांची नावे व ते ज्या संस्थांचे प्रतिनिधीत्व करतात त्या संस्थांची नावे : ..................

(३) शिबिरात आयोजित प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी कोणकोण्त्या शासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली ? : ..................

(४) शिबिरार्थींची निवास व्यवस्था कोठे करण्यात आली ? : ..................

(५) शिबिरापूर्वी शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण झाले आहे काय ? असल्यास तारखा व नसल्यास संभाव्य तारखा : ..................

**(ब) शिबिराचा कालावधी तारखांसह :**

(शिबिराच्या कालावधीत बदल केल्यास त्वरित विद्यापीठ रासेयो विभागाला कळवावे) : ..................

(क) शिबिर आयोजित करित असलेल्या गावातील प्रमुख समस्या : ..................

(ड) शिबिरात कार्यान्वित करण्यासाठी निश्चित करण्यात आलेले प्रकल्प :

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव किंवा स्वरूप | लक्ष्य | प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी कुणाची मदत घेणार | प्रकल्पाचा फायदा कुणाला होणार |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |

(आवश्यक वाटल्यास सहपत्र जोडावे)

(इ) शिबिरार्थींची संख्या

(१) शिबिरात सहभागी होणाऱ्या रा.से.यो. विद्यार्थींची संख्या : मुले ........ मुली ........ एकूण ........

(२) शिबिरात सहभागी होणाऱ्या गैर विद्यार्थी युवकांची संख्या : मुले ........ मुली ........ एकूण ........

(३) शिबिरात सहभागी प्राध्यापकांची संख्या : पुरुष ........ स्त्रिया ........ एकूण ........

शिबिरार्थींची एकूण संख्या : पुरुष ........ स्त्रिया ........ एकूण ........

(शक्य असल्यास विद्यार्थी, गैरविद्यार्थी व प्राध्यापकांची यादी सोबत जोडावी.)

(फ) इतर माहिती : ..............................................................................................................................................

....................................................................................................................................................................

....................................................................................................................................................................

....................................................................................................................................................................

....................................................................................................................................................................

....................................................................................................................................................................

रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी                                        प्राचार्य

दिनांक :

## कार्यालयीन उपयोगाकरिता

प्रस्ताव तपासला असून प्रस्तावास मान्यता द्यावी ही विनंती.
प्रस्तावात त्रुटी आढळल्यामुळे प्रस्ताव परत महाविद्यालयाकडे पाठविण्यात यावा.

रासेयो संपर्क कक्ष                                        कार्यक्रम समन्वयक